लोकमत

# जाहिरात

## डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय, गांधीबाग, नागपूर

## (परिचारिका प्रशिक्षण विद्यालय)

मा. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी निश्चित केलेल्या खालील कोट्यानुसार परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय, नागपूर येथे सुरू होणाऱ्या स्त्री सहाय्यकारी परिचारिका प्रसविका प्रशिक्षण, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ दोन वर्षीय अभ्यासक्रमाकरिता (ए.एन.एम.) प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असलेल्या महिला उमेदवारांकडून खाली दर्शविलेल्या रिक्त कोट्याप्रमाण खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहे.

**स्त्री सहाय्यकारी परिचारिका प्रसविका दोन वर्ष अभ्यासक्रम (ए.एन.एम.) मंजूर कोटा**

| अजा | | अज | विजा. (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग | आर्थिक दुर्बल | खुला | | अनाथ | आशा | एकूण जागा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | दिव्यांग | | | | | | | | | सर्वसाधारण | दिव्यांग | | | |
| ४ | १ | २ | २ | १ | २ | ० | ८ | ४ | ४ | ९ | १ | ० | २ | ४० |

| | |
|---|---|
| अर्ज शुल्क | खुला प्रवर्गाकरिता - रु. ४००/-, राखीव प्रवगाकरिता - रु. २००/- |
| वय | दि. ३१ जुलै २०२५ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| शैक्षणिक अर्हता | १२वी विज्ञान, कला व वाणिज्य शाखेत किमान ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक असेल. |
| अर्ज मागणी ठिकाण दिनांक व वेळ | परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय, नागपूर<br>दि. ०२.०६.२०२५ ते १०.०६.२०२५ सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत शासकीय सुट्यांचे दिवस वगळता<br>अर्ज मागणीकरिता प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती दाखविणे आवश्यक राहील. |
| भरलेले अर्ज स्वीकारणे | दि. ०२.०६.२०२५ ते १२.०६.२०२५ सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत<br>विहित नमुन्यातील अर्जात दिल्याप्रमाणे सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती सोबत जोडाव्यात. |
| गुणवत्ता यादी व आक्षेपानंतरची अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे | दि. १३.०६.२०२५ रोजी दुपारी २ नंतर परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केल्या जाईल<br>व काही आक्षेप असल्यास दि. १३.०६.२०२५ ते १६.०६.२०२५ पर्यंत नोंदवावे.<br>आक्षेपानंतरची अंतिम गुणवत्ता यादी दि. १७.०६.२०२५ ला प्रसिद्ध करण्यात येईल. |
| समुपदेशन व मूळ प्रमाणपत्र पडताळणी | दि. १८.०६.२०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय, नागपूर येथे समुपदेशन यादीतील पात्र उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांसह स्वःखर्चाने स्वतः हजर राहावे. तपासणी वेळी कोणतेही मूळप्रमाणपत्र नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| निवड यादी प्रकाशित करणे | दि. १९.०६.२०२५ रोजी दुपारी २ नंतर परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केल्या जाईल. |

**टीप :-**

१) अपंग उमेदवार आय.एन.सी.च्या पत्र क्र.एफ.नं.१-५/२०१८, आयएनसी दि. १९.०४.२०१९ च्या परिपत्रकानुसार प्रवेशास पात्र राहील. तसेच अनाथ व्यक्तीकरिता वरील तक्त्यातील कोट्यानुसार आरक्षित राहील.
(शासन निर्णय क्रमांक - अनाथ-२०१८/प्र.क्र.२०१८२/का-०३ दि. २३.०८.२०२१)

२) ४० उमेदवारांच्या मंजूर वर्गनिहाय कोट्यामधून २ जागा शैक्षणिक अर्हताप्राप्त आशा स्वयंसेविकाकरिता राखीव असून त्यांची निवड त्यांच्या गुणवत्तेनुसार करण्यात येईल. आशा स्वयंसेविका यांनी त्यांच्या पदावर सलग किमान ३ वर्ष सेवा देणे आवश्यक असून सदर बाबीचे सेवा कार्यकाल व मागील ३ वर्षाचे एकत्रित मानधनाबाबतचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३) प्रवेश अर्जासोबत दिलेल्या अटी व शर्ती तसेच सूचनांचे पालन करूनच भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. प्रक्रियेसंबंधी माहिती परिचारिका प्रशिक्षण विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. ती प्रत्यक्ष येऊन पाहण्याची जबाबदारी ही अर्जदाराची राहील.

स्वा/-
**वैद्यकीय अधीक्षक**
**डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालय, नागपूर**

DGIPR-2025-26/क्र.5/C-882